महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती) , महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440022
दूरध्वनी क्र. 0712- 2870120/121 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

दिनांक : २१ मार्च २०२६

# जिद्द-शिस्तीशिवाय स्पर्धा परीक्षेत यश अशक्य - मिलिंद नारिंगे

## पुणे दौऱ्यात 'महाज्योती'कडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

स्पर्धा परीक्षांच्या कठीण रणांगणात यश मिळवायचे असेल, तर केवळ अभ्यास पुरेसा नसून जिद्द, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे, असा ठाम विश्वास 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केला. पुणे दौऱ्यात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांनी यशस्वी होण्यासाठी आवश्यक दिशा दिली आणि आत्मविश्वासाची नवी ऊर्जा निर्माण केली. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी शनिवारी (२१ मार्च २०२६) पुण्यातील युनिक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्र आणि ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्राला भेट देत प्रशिक्षण व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत स्पर्धा परीक्षांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा सल्ला मिलिंद नारिंगे यांनी दिला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मिलिंद नारिंगे म्हणाले की, स्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त प्रश्नपत्रिका नव्हे, तर स्वतःला सिद्ध करण्याची मोठी संधी आहे. सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य दिशा असेल, तर कोणतीही पार्श्वभूमी यशाच्या आड येऊ शकत नाही. 'महाज्योती' प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. त्यांच्या या शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण झाला. या दौऱ्यावेळी विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले. यात युनिक अकॅडमीमधील केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करणारे धनंजय संजय दिघे (५२९ वा क्रमांक) यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच ज्ञानदीप अकॅडमीमधील सुरज गावडे (गट विकास अधिकारी), कोमल पाटोळे (उपविभागीय पोलिस अधिकारी) आणि शुभम तिजारे (लेखा व वित्त अधिकारी) या यशस्वी विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी 'महाज्योती'च्या पुणे विभागीय कार्यालयातील सहायक संशोधन अधिकारी पल्लवी कडू तसेच कर्मचारी विकास झोडगे उपस्थित होते. त्यांनी प्रशिक्षण केंद्रांतील विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा आणि सहाय्याचा आढावा सादर केला.

प्रति,
१) मा. संपादक,प्रिंट, ईलेक्ट्रानिक, डिजीटल माध्यम
२) मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
३) मा.जिल्हा माहिती अधिकारी (सर्व जिल्हे)

मा. महोदय,
कृपया उपरोक्त वार्तांकनास आपल्या माध्यमात प्रसिद्धी करावे ही नम्र विनंती.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),
महाराष्ट्र राज्य, नागपूर






GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
Grmh+j8q, Bahiratwadi, Bhageerath, Gokhalenagar, Pune, Maharashtra
411016, India
Lat 18.534004° Long 73.828038°
Saturday, 21/03/2026 11:20 AM GMT +05:30
Google